# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक-२.

रजि. ऑफीस आदिवासी विकास भवन, २ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००२.
दुरध्वनी - ०२५३-२३१५८६०, फॅक्स - (०२५३) २३१५८६०
Mail :- shabarinsk@gmail.com

## -: संचालक मंडळ सभा इतिवृत्त :-

दि.२६/०९/२०२३ रोजी मा.मंत्री, आदिवासी विकास तथा अध्यक्ष, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., यांचे अध्यक्षतेखाली सायं.७.०० वाजता मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेस खालील संचालक / अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | हुद्दा | उपस्थित / अनुपस्थित |
|---|---|---|---|
| १ | मा.नामदार डॉ. विजयकुमार गावित<br>अध्यक्ष, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक तथा मा.मंत्री, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | मा.श्री.डॉ.प्रदिप व्यास<br>अपर मुख्य सचिव,<br>आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | संचालक | उपस्थित |
| ३ | मा.श्रीमती लीना बनसोड<br>आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक | संचालक | उपस्थित |
| ४ | मा.श्री.रविंद्र जाधव<br>उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | संचालक | उपस्थित |
| ५ | मा.श्रीमती लीना बनसोड<br>व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक | सदस्य सचिव | उपस्थित |

मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने संचालक मंडळाचे सभेस सुरुवात केली आहे.

**विषय क्र. १ : दिनांक ०३/०५/२०२३ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त कायम करणे.**

दि.०३/०५/२०२३ रोजी मा.अध्यक्ष, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ तथा मंत्री, आदिवासी विकास यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त तसेच सदर सभेमध्ये पारित झालेल्या ठरावावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सभेस व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१ :- दि.०३/०५/२०२३ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यात येत आहे. व ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.२- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२१-२२ चे प्रारुप अंतिम लेख्यास मंजुरी देणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२१-२२ चे लेखे तयार केलेले असुन सदरच्या अहवाल वर्षातील ठळक बाबी खालील प्रमाणे आहेत.

(रुपये लक्ष)

| अ.क्र | तपशिल | २०२०-२१ | २०२१-२२ |
|---|---|---|---|
| १ | भागभांडवल | ८७११.२१ | ८७११.२१ |
| २ | भाग आवेदन रक्कम प्रलंबित वाटप (Share Application Money Pending Allotment) | १००.९७ | १००.९७ |
| ३ | उलाढाल | ७३०.२६ | ६९५.२८ |
| ४ | नक्त संपत्ती (Net Worth) | १२३८८.९२ | १२७७८.३९ |
| ५ | राखीव निधी (Reserve & Surplus) | ११३२.८९ | १५२२.३५ |
| ६ | कर्ज देणे (NSTFDC, New Delhi Outstanding) | १२०१.४६ | १२३२.४९ |
| ७ | कर्ज येणे (Loans to Beneficiaries) | ८३४६.११ | ९६१२.८२ |
| ८ | गुंतवणुक व बॅंक शिल्लक | २१८४१.४६ | २४७५९.१९ |
| ९ | देणे तरतुद | ५०१.३९ | ४७३.६८ |
| १० | स्थायी मालमत्ता | २९.९० | २८.७६ |
| ११ | नफा | ३५७.५६ | ३८९.४६ |

अहवाल वर्षात शबरी महामंडळास रु.३८९.४६ लक्ष इतका संभाव्य निव्वळ नफा झालेला आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२१-२२ चे अंतिम लेखे संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर. संचालक मंडळाच्या मान्यतेनंतर मा.महालेखापाल कार्यालय, नवी दिल्ली यांचेकडून नियुक्त करण्यात आलेल्या एल.के. सराफ अँण्ड कंपनी, संवैधानिक लेखापरिक्षक, नाशिक यांचेकडे सदरचे अंतिम लेखे लेखापरिक्षणासाठी पाठविण्यास सभेकडुन मंजुरी मिळणेस विनंती.

**ठराव क्र.२ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या सन २०२१ - २२ या आर्थिक वर्षाच्या अंतिम लेख्यास सभेकडून मंजुरी देण्यात येत आहे व सदरचे अंतिम लेखे महामंडळाचे संवैधानिक लेखापरीक्षक एल.के. सराफ अँण्ड कंपनी, सनदी लेखापाल, नाशिक यांचेकडे लेखापरीक्षणासाठी पाठविण्यास सभेकडून मंजुरी देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.३- संवैधानिक लेखापरीक्षकाचे सन २०२१-२२ व सन २०२२-२३ साठी AG ने निश्चित केलेले लेखापरिक्षण शुल्क मान्य करणेबाबत.**

काम्ट्रोलर अँड ऑडीटर जनरल नवी दिल्ली यांचे कडील पत्र क्र.CA.V/COY /MAHARASHTRA /SHABARI (१)/१६१९ दिनांक २७.०८.२०२१ अन्वये एल.के.सराफ, सनदी लेखापाल, नाशिक (WR2043) यांची शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या आर्थिक वर्ष २०२१-२२ या वर्षाच्या लेख्यांचे लेखापरिक्षणाकरीता संवैधानिक लेखा परिक्षक (Statutory Auditor) म्हणून नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

कामट्रोलर अँड ऑडीटर जनरल नवी दिल्ली यांचे कडील पत्र क्र. CA.V/COY /MAHARASHTRA /SHABARI (१)/१६१९ दिनांक २७.०८.२०२१ मधील ANNEXURE - II नुसार सन २०२१-२२ साठी लेखापरिक्षण शुल्क रक्कम रु.२,१५,७६३/- नमुद करण्यात आलेले आहेत. सदर रक्कम विचारात घेवून लेखापरीक्षण शुल्क खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

**रक्कम (रु.)**

| अ.क्र. | तपशिल | सन २०२१-२२ |
|---|---|---|
| १ | लेखापरीक्षण | २,१५,७६३/- |
| २ | अधिक - १५% टॅक्स ऑडीटची रक्कम रु. | ३२,३६४/- |
| ३ | **एकूण (१+२)** | **२,४८,१२७/-** |
| ४ | अधिक - ९% सी.जी.एस.टी. रक्कम रु. | २२,३३१/- |
| ५ | अधिक - ९% एस.जी.एस.टी. रक्कम रु. | २२,३३१/- |
| | **एकूण रु. (३+४+५)** | **२,९२,७८९/-** |

कामट्रोलर अँड ऑडीटर जनरल नवी दिल्ली यांचे कडील पत्र क्र.CA.V/COY /MAHARASHTRA /SHABARI (१)/२८९ दिनांक २९.०८.२०२२ अन्वये पटेल कलंत्री अँण्ड असोसिएट्स, सनदी लेखापाल, नाशिक (WR0477) यांची शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या आर्थिक वर्ष २०२२-२३ या वर्षाच्या लेख्यांचे लेखापरिक्षणाकरीता संवैधानिक लेखा परिक्षक (Statutory Auditor) म्हणून नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

काम्ट्रोलर अँड ऑडीटर जनरल नवी दिल्ली यांचे कंडील पत्र क्र. CA.V/COY /MAHARASHTRA /SHABARI (१)/२८९ दिनांक २९.०८.२०२२ मधील ANNEXURE - II नुसार सन २०२२-२३ साठी लेखापरिक्षण शुल्क रक्कम रु.२,१५,७६३/- नमुद करण्यात आलेले आहेत. सदर रक्कम विचारात घेवून लेखापरीक्षण शुल्क खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

रक्कम (रु.)

| अ.क्र. | तपशिल | सन २०२२-२३ |
|---|---|---|
| १ | लेखापरीक्षण | २,१५,७६३/- |
| २ | अधिक - १५% टॅक्स ऑडीटची रक्कम रु. | ३२,३६४/- |
| ३ | **एकुण (१+२)** | **२,४८,१२७/-** |
| ४ | अधिक - ९% सी.जी.एस.टी. रक्कम रु. | २२,३३१/- |
| ५ | अधिक - ९% एस.जी.एस.टी. रक्कम रु. | २२,३३१/- |
| | **एकुण रु. (३+४+५)** | **२,९२,७८९/-** |

जी.एस.टी. रक्कम व टॅक्स ऑडीटची रक्कम सध्याच्या प्रचलित दरानुसार नमुद केलेली आहे. सदरच्या दरामध्ये वेळोवेळी होणा-या बदलानुसार, त्या वेळीच्या प्रचलित दरानुसार जी.एस.टी. ची रक्कम व टॅक्स ऑडीटची रक्कम संवैधानिक लेखापरिक्षक यांना अदा करावी लागेल. तसेच सदरच्या रकमेतुन नियमानुसार आयकर कपात करण्यात येईल.

तसेच वरील प्रमाणे नमुद लेखा परिक्षण शुल्क व्यतिरिक्त संवैधानिक लेखापरिक्षक व त्यांचे सहाय्यकांचा प्रवास खर्च, स्थानिक प्रवास खर्च स्टेशनरी खर्च, निवास खर्च, चहापाणी व अल्पोपहार खर्च, भोजन खर्च इ. खर्च यापुर्वी प्रमाणेच महामंडळाकडून करण्यांत येईल.

उपरोक्त प्रमाणे सन २०२१-२२ साठी एकुण रु.२,९२,७८९/- (अक्षरी दोन लक्ष ब्याणव हजार सातशे एकोणनव्वद रुपये मात्र) चे लेखापरीक्षण शुल्क व सन २०२२-२३ साठी एकुण रु. २,९२,७८९/- (अक्षरी दोन लक्ष ब्याणव हजार सातशे एकोणनव्वद रुपये मात्र) चे लेखापरीक्षण शुल्क संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर.

तसेच लेखापरीक्षकांचा स्थानिक प्रवास खर्च, स्टेशनरी खर्च, निवास खर्च, चहापाणी व अल्पोपहार खर्च इ. खर्च संवैधानिक लेखापरिक्षणासाठी करण्यांस संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

**ठराव क्र.३ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे टॅक्स ऑडीट (Tax Audit) करण्यासाठी स्वतंत्रपणे सनदी लेखापालाची नेमणुक करण्यात आलेली नाही. आयकर कायदा,१९६१ नुसार Tax Audit करुन घेणे बंधनकारक असल्याने शबरी महामंडळाच्या स्थापनेपासुन संवैधानिक लेखापरिक्षकाकडुन Tax Audit करुन घेण्यात येते. त्यासाठी लेखापरीक्षण शुल्काच्या सरासरी १५% अदा करण्यात येते. करीता कास्ट्रोलर अँड ऑडीटर जनरल, नवी दिल्ली यांनी नेमणुक केलेले एल.के.सराफ, सनदी लेखापाल, नाशिक (WR२०४३) या संवैधानिक लेखापरिक्षकाच्या सन २०२१-२२ साठी रु.२,९२,७८९/- (अक्षरी दोन लक्ष ब्याणंव हजार सातशे एकोणनव्वद रुपये मात्र) चे लेखापरीक्षण शुल्क तसेच पटेल कलंत्री अँण्ड असोसिएट्स, सनदी लेखापाल, नाशिक (WR०४७७) या संवैधानिक लेखापरिक्षकाच्या सन २०२२-२३ साठी रु. २,९२,७८९/- (अक्षरी दोन लक्ष ब्याणव हजार सातशे एकोणनव्वद रुपये मात्र) चे लेखापरीक्षण शुल्क व लेखापरीक्षकांचा स्थानिक प्रवास खर्च, स्टेशनरी खर्च, निवास खर्च, चहापाणी व अल्पोपहार खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.४- दिनांक ०१/०४/२०२३ ते ३१/०८/२०२३ या कालावधीत महामंडळाने केलेल्या गुंतवणुक / फेर गुंतवणुकीचा अहवाल सादर करणेबाबत.**

दिनांक २८/०६/२००६ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या सभेतील ठराव क्र.५ नुसार महामंडळाकडुन करण्यात येणा-या गुंतवणुकीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

दिनांक ०१/०९/२०२२ ते दिनांक ३१/०३/२०२३ अखेरपर्यंतच्या गुंतवणुकीच्या कार्यवाहीस दिनांक ०३/०५/२०२३ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या सभेकडुन ठराव क्र.२ अन्वयें मान्यता देण्यात आलेली आहे.

मु. का. नाशिक चे पत्र क्र. शआविविम/लेखा/२८०/२०१७ दिनांक ०८/०७/२०१७ अन्वये महामंडळाला डोअर स्टेप देणाऱ्या बॅंकाकडुन पत्र मागविण्यात आले होते. त्यानुसार ज्या राष्ट्रीयकृत बॅंकांकडुन महामंडळाच्या गुंतवणुकीच्या अटी व शर्ती मान्य असणारे पत्र प्राप्त झाल्यास सदरच्या बॅंकांमध्ये गुंतवणुक करण्यात आलेली आहे. या पुढे सुध्दा महामंडळाच्या अटी व शर्ती ज्या राष्ट्रीयकृत बॅंकाना मंजुर असतील त्याचे कडुन लेखी पत्र घेवुन गुंतवणुक करण्यासाठी महामंडळाच्या पॅनलमध्ये समावेश करण्यांचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्याचे मान्यतेस सादर.

दिनांक ०१/०४/२०२३ ते दिनांक ३१/०८/२०२३ या कालावधीतील शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक कार्यालयाने राष्ट्रियकृत बॅंकेत केलेल्या मुदत ठेव गुंतवणुक / फेरगुंतवणुकीचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | राष्ट्रीयकृत बॅंकेचे नाव | गुंतवणुक दिनांक | मुदत | व्याजदर | रक्कम रुपये लक्ष |
|---|---|---|---|---|---|
| **अ)** | **बॅंक ऑफ महाराष्ट्र, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक खाते क्र. २००४६६१५९५६ येथुन करण्यात आलेल्या मुदतठेव गुंतवणुका** | | | | |
| १ | पंजाब नॅशनल बॅंक, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक | २७/०४/२०२३ | ३० दिवस | ३.५०% | १,६०,००,०००/- |
| २ | पंजाब नॅशनल बॅंक, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक | १९/०५/२०२३ | १ वर्ष | ६.८०% | १,५७,८७,५४७/- |
| ३ | पंजाब नॅशनल बॅंक, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक | ३०/०५/२०२३ | ३० दिवस | ३.५०% | १,६०,००,०००/- |
| ४ | बॅंक ऑफ बडोदा, शाखा एम.जी. रोड, नाशिक | ०८/०६/२०२३ | १ वर्ष | ७.५५% | ७,५८,४८,२५४/- |
| ५ | पंजाब नॅशनल बॅंक, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक | ३०/०६/२०२३ | ३० दिवस | ३.५०% | १,६०,९२,१८७/- |
| ६ | कॅनरा बॅंक, गंगापुर रोड, नाशिक | ०५/०७/२०२३ | १ वर्ष | ७.००% | १,८८,६६,२३६/- |
| ७ | युनियन बॅंक ऑफ इंडिया, शाखा नाशिक सिटी, नाशिक | १७/०७/२०२३ | १ वर्ष | ७.६०% | १६,५४,३६,०५९/- |
| ८ | कॅनरा बॅंक, गंगापुर रोड, नाशिक | १९/०७/२०२३ | १ वर्ष | ७.६३% | १०,६८,१९,३६१/- |
| ९ | कॅनरा बॅंक, गंगापुर रोड, नाशिक | ३१/०७/२०२३ | १ वर्ष | ७.६५% | २,१४,३८,६९२/- |
| १० | कॅनरा बॅंक, गंगापुर रोड, नाशिक | ३१/०७/२०२३ | ३० दिवस | ४.००% | १,६१,३८,४८०/- |
| ११ | बॅंक ऑफ बडोदा, शाखा एम.जी. रोड, नाशिक | ०७/०८/२०२३ | १ वर्ष | ७.५५% | २,२३,९८,६३४/- |
| १२ | बॅंक ऑफ बडोदा, शाखा नरसिंग नगर, नाशिक | ०९/०८/२०२३ | १ वर्ष | ७.५५% | ४,४९,२९,६५७/- |
| १३ | स्टेट बॅंक ऑफ इंडिया, नाशिक शाखा, नाशिक | १४/०८/२०२३ | १ वर्ष | ६.८०% | १,१८,२२,९८९/- |
| १४ | कॅनरा बॅंक, गंगापुर रोड, नाशिक | ३१/०८/२०२३ | ३० दिवस | ४.००% | १,३०,००,०००/- |
| **ब)** | **बॅंक ऑफ महाराष्ट्र, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक खाते क्र. ६०३४४९०९१९८ येथुन करण्यात आलेल्या मुदतठेव गुंतवणुका** | | | | |
| १५ | पंजाब नॅशनल बॅंक, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक | १३/०४/२०२३ | ९१ दिवस | ६.००% | ३,००,००,०००/- |
| १६ | स्टेट बॅंक ऑफ इंडिया, नाशिक शाखा, नाशिक | ०२/०५/२०२३ | ९१ दिवस | ६.५०% | ५,००,००,०००/- |
| १७ | इंडियन बॅंक, शाखा अंबड, नाशिक | ०२/०८/२०२३ | ३० दिवस | ६.६०% | ५,०८,०८,७९०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा नाशिक सिटी, नाशिक | ०४/०८/२०२३ | १८१ दिवस | ७.२५% | १०,४०,००,०००/- |
| १९ | बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनडा कॉर्नर, नाशिक | ०४/०८/२०२३ | ९१ दिवस | ४.४०% | १०,४०,००,०००/- |
| **क)** | **युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा नाशिक सिटी, नाशिक खाते क्र. ३२३८०२०११०१५४५७ येथुन करण्यात आलेल्या मुदतठेव गुंतवणुका** | **गुंतवणुक दिनांक** | **मुदत** | **व्याजदर** | **रक्कम रुपये लक्ष** |
| २० | युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा नाशिक सिटी, नाशिक | ११/०४/२०२३ | ९१ दिवस | ७.२५% | १५९,३०,५०,०००/- |
| २१ | इंडियन बँक, शाखा नाशिक सिटी, नाशिक | ११/०७/२०२३ | ४६ दिवस | ६.८०% | १६२,१८,४४,९२४/- |
| २२ | बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनडा कॉर्नर, नाशिक | २८/०८/२०२३ | ४६ दिवस | ७.१०% | ५०,००,००,०००/- |
| २३ | बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनडा कॉर्नर, नाशिक | २८/०८/२०२३ | ९१ दिवस | ७.२०% | ११३,५७,४३,९१३/- |

वरील प्रमाणे गुंतवणुक माहितीस्तव तथा मान्यतेस्वत सविनय सादर.

**ठराव क्र.४:- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या दिनांक ०१/०४/२०२३ ते ३१/०८/२०२३ या कालावधीत केलेल्या मुदत ठेव गुंतवणुक / फेर गुंतवणुकीच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.५- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या SCA व PVTG या योजनांच्या असलेल्या निधीपैकी प्रत्यक्ष अदायगी वर २% होणारी शबरी प्रशासकीय खर्चाची रक्कम स्वतंत्र बँक खात्यात ठेवण्यासाठी उघडण्यांत आलेल्या बँक ऑफ बडोदा, शाखा-आर.के, नाशिक येथील उघडण्यांत आलेल्या खात्यास मान्यता मिळणेबाबत.**

शबरी महामंडळाकडे खालील प्रमाणे केंद्र व राज्य शासनाच्या वेगवेगळ्या योजना राबविण्याचे कामकाज सुरु आहे.

१) Article २७५ (१),
२) Development of Particularly Vulneracle Tribal Group (PVTG),
३) Special Central Assistance to Tribal (SCA)
४) State Scheme
५) Dairy Scheme

सदरच्या योजना पारदर्शक पद्धतीने राबविणेसाठी निधी वाटप करण्याचे कामकाज सुरु असुन सदरच्या निधीपैकी २% किंवा नियमानुसार होणारी शबरी व्यवस्थापन खर्चाची रक्कम ही स्वतंत्र बँक खात्यात ठेवणे आवश्यक आहे.

करीता शबरी महामंडळाकडील योजनांच्या असलेल्या निधीपैकी प्रत्यक्ष अदायगी वर २% किंवा नियमानुसार होणारी शबरी प्रशासकीय खर्चाची रक्कम बँक ऑफ बडोदा, शाखा - आर.के., नाशिक येथे ठेवण्यासाठी **शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादीत, नाशिक** या नावाने नवीन बचत खाते उघडण्यात आलेले आहे.

बँकेचे नाव :- बँक ऑफ बडोदा, शाखा - आर. के. नाशिक
सेव्हिंग खाते क्र. 97620100017658
IFSC Code - BARB0DBRAVI
(Fifth character is zero)

उपरोक्त प्रमाणे बँक ऑफ बडोदा, शाखा - आर.के., नाशिक या बँकेत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, नाशिक यांचे उघडण्यात आलेल्या बचत खात्याच्या कार्यवाहीस मंजुरी मिळावी.

**ठराव क्र.५:- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या निधीपैकी प्रत्यक्ष अदायगी वर २% किंवा नियमानुसार होणारी शबरी प्रशासकीय खर्चाची रक्कम स्वतंत्र बँक खात्यात ठेवण्यासाठी बँक ऑफ बडोदा, शाखा - आर.के., नाशिक येथे उघडण्यात आलेले खाते क्र. 97620100017658 यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.६- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा मार्फत राबविण्यांत येणाऱ्या योजना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ सेवा हक्काच्या कक्षेत आणणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा मार्फत अनुसूचित जमातीचे सुशिक्षित बेरोजगारांना त्यांचे जीवनमान उंचावण्याकरीता स्वयंरोजगारासाठी कर्ज स्वरुपात अल्प व्याजदराने एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली पुरस्कृत विविध योजना राबविण्यांत येतात.

त्याअनुषंगाने सदरच्या योजना राबवितांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (The Maharashtra Right to Public Service Act, २०१५) अन्वये विहित कालमर्यादेत सेवा पुरवणेकामी खालीलप्रमाणे आराखडा तयार करण्यांत आलेला आहे. तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr No | Name of the service | Nature of the service | Timelime |
|---|---|---|---|
| 1 | Agriculture related Loan Scheme under NSTFDC | Decision regarding approval of loan | 30 days from last date of acceptance of applications |
| | | Disbursement of loan | 30 days of receipt of funds from NSTFDC or 30 days from the date of sanction of loan whichever is earlier |
| 2 | Mahila Sakshamikan Yojana under NSTFDC | Decision regarding approval of loan | 30 days from last date of acceptance of applications |
| | | Disbursement of loan | 30 days of receipt of funds from NSTFDC or 30 days from the date of sanction of loan whichever is earlier |
| ३ | Laghu udyog yojana (Small Business loans ) under NSTFDC | Decision regarding approval of loan | 30 days from last date of acceptance of applications |
| | | Disbursement of loan | 30 days of receipt of funds from NSTFDC or 30 days from the date of sanction of loan whichever is earlier |
| ४ | Micro credit loans to SHG s under NSTFDC | Decision regarding approval of loan | 30 days from last date of acceptance of applications |
| | | Disbursement of loan | 30 days of receipt of funds from NSTFDC or 30 days from the date of sanction of loan whichever is earlier |
| ५ | Bulk finance to Adivasi societies under NSTFDC | Decision regarding approval of loan | 30 days from last date of acceptance of applications |
| | | Disbursement of loan | 30 days of receipt of funds from NSTFDC or 30 days from the date of sanction of loan whichever is earlier |

Dhakave

सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.
सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.६ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा मार्फत राबविण्यांत येणाऱ्या योजना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ सेवा हक्काच्या कक्षेत आणण्यास व त्यानुसार एकूण ५ सेवा सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय क्र.७- एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना राबविणेकामी लाभार्थीकडून मागविण्यांत येणाऱ्या कागदपत्रे निश्चिती करणेबाबत.**

शबरी आदिवासी विकास महामंडळामार्फत आदिवासी बांधवांसाठी एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत स्वयंरोजगाराच्या कर्ज योजना राबविल्या जातात. त्याअनुषंगाने एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना राबविणेकामी यापुर्वी दि.२३/०६/२००५ रोजीचा संचालक मंडळ सभेतील मंजुर ठराव क्र.५ व मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र.३३८/२००५ दि.२२ सप्टेंबर, २००५ अन्वये कर्ज योजनेचे निकष (अटी / शर्ती) ठरवून देण्यांत आलेले होते. सद्यस्थितीत सदर अटी / शर्तीमध्ये बदल करण्यांत येत असुन सुधारीत अटी / शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

**कर्ज योजनांसाठी पात्रता अटी :-**

१) लाभार्थी अर्जदार आदिवासी समाजाचा असावा.
२) लाभार्थीचे वार्षिक कौटुबिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागासाठी उत्पन्नाची मर्यादा रु.३,००,०००/- इतकी आहे.
३) लाभार्थीची वयोमर्यादा सर्व योजनांसाठी १८ वर्ष ते ४५ वर्ष या दरम्यान असावी.
४) महिला सशक्तीकरण योजनेसाठी लाभार्थ्यांकडून कोणताही वैयक्तिक सहभाग मार्जीन मनी अपेक्षित नाही. तसेच जात प्रमाणपत्रा बाबत महिलेच्या पतिचे अथवा मुला मुलींचे जात प्रमाणपत्र देखील ग्राहय धरावे.
५) महिला सशक्तीकरण कर्जावर द.सा.द.शे.४% एवढया अल्प दराने सरळ व्याज आकारले जाते.
६) तहसिल किंवा उपविभागीय कार्यालय (प्रांत) यांचा जातीचा दाखला. (फक्त आदिवासी)
७) शाळा सोडल्याचा दाखला. (वय वर्ष १८ ते ४५)
८) तहसिल कार्यालयाकडील उत्पन्नाचा दाखला. (ग्रामीण व शहरी भागासाठी रु.३,००,०००/- इतके असावे.)
९) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालीका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना.
१०) व्यवसाय प्रकल्प अहवाल संबंधित शाखा व्यवस्थापक यांनी स्वतः इच्छुक लाभार्थींना मार्गदर्शन करुन संक्षिप्त रित्या तयार करुन देणे.
११) व्यवसायासाठी लागणारे सर्व साहीत्याचे कोटेशन.
१२) रेशनकार्ड छायाप्रत.
१३) आधारकार्ड.
१४) पॅनकार्ड असल्यास त्याची छायाप्रत.
१५) तीन पासपोर्ट साईज फोटो.
१६) वाहन व्यवसायासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) यांचे प्रचलित कायद्यानुसार आवश्यक कागदपत्रे.
१७) स्वतःचा हिस्सा म्हणून भरावी लागणारी ५% सहभाग रक्कम.
१८) रक्कम रु.५.०० लक्ष पेक्षा अधिक कर्ज योजनेसाठी एक सक्षम जामीनदार घेण्यांत यावे.

➢ **बचतगट / सहकारी संस्थांसाठी आवश्यक कागदपत्रे-**

१) बचतगट / सहकारी संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र.

२) बचतगट / सहकारी संस्थांचे सर्व सभासद यादी, त्यांचे रेशनकार्ड व जातीचे दाखले.

३) बचतगट / सहकारी संस्थांचे कमीत कमी सहा महिन्यांचे बँक खाते उतारा / स्टेटमेंट.

४) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालीका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना

५) व्यवसायासाठी लागणाऱ्या साहित्याचे कोटेशन.

एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना राबवितांना यापुढे उपरोक्त प्रमाणे आवश्यक कागदपत्रे घेण्यांत येऊन कार्यवाही करणेबाबत मा.व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार देणेसाठी सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.७ :- एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना राबविणेकामी लाभार्थीकडून मागविण्यांत येणाऱ्या कागदपत्रे निश्चिती करणेबाबत च्या विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली असुन खालीलप्रमाणे एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनांसाठी पात्रता अटी व आवश्यक कागदपत्रांस सर्वानुमते खालीलप्रमाणे मान्यता देण्यांत येत आहे.**

**कर्ज योजनांसाठी पात्रता अटी :-**

१) लाभार्थी अर्जदार आदिवासी समाजाचा असावा.

२) लाभार्थीचे वार्षिक कौटुबिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागासाठी उत्पन्नाची मर्यादा रु.३,००,०००/- इतकी आहे.

३) लाभार्थीची वयोमर्यादा सर्व योजनांसाठी १८ वर्ष ते ४५ वर्ष या दरम्यान असावी.

४) महिला सशक्तीकरण योजनेसाठी व स्वयंसहाय्यता बचतगट योजनेसाठी लाभार्थ्यांकडून कोणताही वैयक्तिक सहभाग मार्जीन मनी अपेक्षित नाही. तथापि इतर योजनांसाठी स्वतःचा हिस्सा म्हणून ५% सहभाग रक्कम घेण्यांत यावी.

५) महिला लाभार्थ्यांच्या बाबतीत जात प्रमाणपत्र नसल्यास महिलेच्या पतिचे अथवा मुला मुलींचे जात प्रमाणपत्र देखील ग्राहय धरावे.

६) रक्कम रु.५.०० लक्ष पेक्षा अधिक कर्ज योजनेसाठी एक सक्षम जामीनदार घेण्यांत यावे.

**कर्ज योजनांसाठी आवश्यक कागदपत्रे :-**

१) तहसिल किंवा उपविभागीय कार्यालय (प्रांत) यांचा जातीचा दाखला. (फक्त आदिवासी)

२) शाळा सोडल्याचा दाखला. (वय वर्ष १८ ते ४५)

३) तहसिल कार्यालयाकडील उत्पन्नाचा दाखला. (ग्रामीण व शहरी भागासाठी रु.३,००,०००/- इतके असावे.)

४) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालीका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना.

५) व्यवसाय प्रकल्प अहवाल संबंधित शाखा व्यवस्थापक यांनी स्वतः इच्छुक लाभार्थींना मार्गदर्शन करुन संक्षिप्त रित्या तयार करुन देणे.

६) व्यवसायासाठी लागणारे सर्व साहीत्याचे कोटेशन.

७) रेशनकार्ड छायाप्रत.

८) आधारकार्ड.

९) पॅनकार्ड असल्यास त्याची छायाप्रत.

१०) लाभार्थ्यांचे स्वतःचे बॅंक खात्याचे पासबुकची छायाप्रत.

१०) तीन पासपोर्ट साईज फोटो.

११) वाहन व्यवसायासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) यांचे प्रचलित कायद्यानुसार परमीट वाहनासाठी आवश्यक कागदपत्रे.

Dhakave

**बचतगट / सहकारी संस्थांसाठी आवश्यक कागदपत्रे-**

१) बचतगट / सहकारी संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र.

२) बचतगट / सहकारी संस्थांचे सर्व सभासद यादी, त्यांचे रेशनकार्ड व जातीचे दाखले.

३) बचतगट / सहकारी संस्थांचे कमीत कमी सहा महिन्यांचे बँक खाते उतारा / स्टेटमेंट.

४) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालीका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना.

५) व्यवसायासाठी लागणाऱ्या साहित्याचे कोटेशन.

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**अनुमोदक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय क्र.८- एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना राबवितांना प्रकल्प कार्यालय स्तरावर आयोजित मुल्यमापन समिती मध्ये लाभार्थी निवडी बाबतचे निकष ठरविणे बाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत आदिवासी बांधवांसाठी एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत स्वयंरोजगाराच्या कर्ज योजना राबविल्या जातात.

त्याअनुषंगाने एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना राबवितांना प्रकल्प कार्यालय स्तरावर गरजू व पात्र उमेदवारांना पारदर्शकपणे योजनेचा लाभ देता यावा, यासाठी मुल्यमापन समितीची सभा आयोजित करण्यांत येते. सदर सभेमध्ये प्रकल्प अधिकारी हे अध्यक्ष असुन इतर सदस्य व शाखा व्यवस्थापक हे सदस्य सचिव असतात.

मुख्य कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/६३९/२०२० नाशिक कद.१७/०३/२०२० अन्वये खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यांत आलेली आहे.

| अ.क्र. | तपशिल | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.प्रकल्प अधिकारी,<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, | अध्यक्ष |
| २. | मा.प्रांत अधिकारी / तहसीलदार संबंधीत कार्यक्षेत्रातील | सदस्य |
| ३. | व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, संबंधित जिल्हा. | सदस्य |
| ४. | मा.प्रादेशिक व्यवस्थापक<br>म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या, नाशिक | सदस्य |
| ५. | शाखा व्यवस्थापक<br>शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, | सदस्य सचिव |

वरील प्रमाणे शाखा कार्यालय स्तरावर मुल्यमापन समिती गठीत करण्यात आलेली असून सदरची समिती शाखा कार्यालय पातळीवर प्राप्त झालेल्या प्रकरणाची तपासणी/छाननी तसेच लाभार्थीची प्रत्यक्ष मुलाखत घेवुन मुल्यमापन समिती शिफारस केल्यानुसार मुख्य कार्यालय स्तरावरुन लाभार्थीची कर्ज प्रकरणे मंजूर केली जातात.

त्याअनुषंगाने लाभार्थ्यांची अंतिम निवड करतांना मुल्यमापन समितीने पडताळणी करतांना सोबत जोडलेल्या विहित नमुन्यानुसार लाभार्थ्यांची गुणांकन पद्धतीने निवड करणेबाबत शाखा कार्यालयांना मुख्य कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/८४०/२०२३ नाशिक दि.३१/०८/२०२३ अन्वये कळविले असुन त्यास मान्यता मिळावी. जेणेकरुन लाभार्थ्यांची निवड करतांना सुसूत्रता व पारदर्शकता राहील.

सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

Bhakare

**ठराव क्र.८ :- एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना राबवितांना प्रकल्प कार्यालय स्तरावर आयोजित मुल्यमापन समिती मध्ये लाभार्थी निवडी बाबतचे निकष ठरविणे बाबत च्या विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली असुन खालीलप्रमाणे मुल्यमापन समितीत बदल व लाभार्थी निवडी बाबत सोबत जोडलेल्या गुणांकन तक्त्यातील निकषास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.**

| अ.क्र. | तपशिल | हुद्या |
|---|---|---|
| १. | मा.प्रकल्प अधिकारी,<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, | अध्यक्ष |
| २. | तहसीलदार संबंधीत कार्यक्षेत्रातील | सदस्य |
| ३. | व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, संबंधित जिल्हा. | सदस्य |
| ४. | प्रादेशिक व्यवस्थापक<br>म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या, नाशिक | सदस्य |
| ५. | शाखा व्यवस्थापक<br>शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, | सदस्य सचिव |

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक शाखा कार्यालय --------------------------

## प्रकल्प अधिकारी कार्यालय-------------

## मुलाखत गुणनिहाय तक्ता

| अ.क्र. | लाभार्थ्याचे नाव | पत्ता | व्यवसायाचे नाव | यापुर्वी इतर संस्थांकडून कर्ज घेतले आहे काय ? असल्यास ५ गुण नसल्यास १० गुण | सदर कर्जाची वसुली भरली किंवा कसे? (थकित नसल्यास १० गुण / थकित असल्यास ०५ गुण) | व्यवसायाचे प्रशिक्षण घेतले आहे काय (प्रशिक्षण घेतले असल्यास १० गुण / नसल्यास ५ गुण) | व्यवसाय आराखडा अवगत आहे किंवा कसे, याबाबत ५ प्रश्न विचारण्यांत यावेत. | मालाची विक्री बाबत नियोजन | कर्ज वसुली बाबत नियोजन (लाभार्थी यांचेशी प्रत्यक्ष चर्चा करुन गुणांकन करावे.) | नियोजित ठिकाणी व्यवसायास यशस्वी होण्यास वाव आहे किंवा कसे ? | व्यवसायाची जागा स्वत:ची किंवा भाडे तत्वावर | स्थळ पाहणी सर्वे नुसार लाभार्थ्यास कर्जाची आवश्यकता आहे काय? | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | (१० गुण) | (१० गुण) | (१० गुण) | (२० गुण) | (१० गुण) | (१० गुण) | (१० गुण) | (१० गुण) | (१० गुण) | १०० गुण पैकी |
| | | | | | | | | | | | | | |

शाखा व्यवस्थापक तथा सदस्य सचिव
शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.,

प्रादेशिक व्यवस्थापक तथा सदस्य
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या.,

व्यवस्थापकतथा सदस्य
जिल्हा उद्योग केंद्र

तहसिलदार तथा सदस्य
संबंधित कार्यक्षेत्रातील

प्रकल्प अधिकारी तथा अध्यक्ष
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

Dhakave

**विषय क्र.९:- एन.एस.टी.एफ.डी.सी. पुरस्कृत योजनांसाठी देण्यांत येणा-या शासन थकहमीस मुदतवाढ देणे व त्याची आर्थिक मर्यादा बाढविणेबाबत.**

शासन निर्णय क्रमांक-शाहमी-२०१९/प्र.क्र.५७/अर्थबळ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई दि.०९ सप्टेंबर, २०१९ अन्वये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत योजनांसाठी रुपये ५० कोटी शासन हमी पुढील पाच वर्षासाठी मिळालेली आहे. सदरची शासन थकहमीची मुदत दि.३१.०३.२०२४ रोजी संपुष्टात येणार आहे.

सदर बाबतीत सादर करण्यांत येते की, एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडून शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास स्वयंरोजगाराच्या विविध योजना आदिवासी बांधवांसाठी राबविणेकामी वेळोवेळी मुदत कर्ज स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्यांत येतो.

सद्यस्थितीत संदर्भिय शासन निर्णयान्वये मिळालेल्या शासन हमी नुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडुन कर्ज वाटपसाठी रक्कम रु.१८,१६,२७,०००/- रक्कम प्राप्त झालेली आहे. तसेच एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडे उर्वरित निधी प्राप्त करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्यांत आलेला असुन निधी प्राप्त झाल्यांनंतर आदिवासी बांधवांना स्वयंरोजगाराच्या योजनांचा लाभ देणेकामी कर्ज वाटपाची कार्यवाही करण्यांत येईल.

एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडून शबरी महामंडळास उपलब्ध होणाऱ्या कर्जाची शासन थकहमीची आर्थिक मर्यादा रु.५०.०० कोटी वरुन १००.०० कोटी पर्यंत करुन शासन थकहमीचा कालावधी दि.०१/०४/२०२४ पासुन पुढील ५ वर्षासाठी वाढविणेबाबत तसेच सदरचा निधी समवर्तक (Revolving) पद्धतीने एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचे मार्फत उपलब्ध होणेकरीता मा.संचालक मंडळाचे मान्यतेस सादर.

सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.९ :- एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडून शबरी महामंडळास उपलब्ध होणाऱ्या कर्जाची शासन थकहमीची आर्थिक मर्यादा रु.५०.०० कोटी वरुन १००.०० कोटी पर्यंत करुन शासन थकहमीचा कालावधी दि.०१/०४/२०२४ पासुन पुढील ५ वर्षासाठी वाढविणेबाबत सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे. सदर बाबतीत व्यवस्थापकीय संचालक यांनी शासनाकडे पाठपुरावा करण्यांत यावा.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय क्र.१०- कंपनी सचिव पदासाठी नियुक्ती करण्याबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची नोंदणी कंपनी कायदा १९५६ अन्वये रजिस्टर ऑफ कंपनीज़ यांच्याकडे नोंदणी करण्यात आली असून कंपनीचा नोंदणी क्र.२५-१३२४७/१९९९ दिनांक १५ जानेवारी, १९९९ हा आहे. तसेच शबरी महामंडळाचा CIN No. U74210MH1999SGC118747 असा आहे.

कंपनी कायद्यानुसार शबरी महामंडळाचे कामकाज करणेकामी यापुर्वी कंपनी सचिव श्री.अशोक सुराणा यांना मुख्य कार्यालयाचे आदेश क्र.No.SAVVM/Project/६९/२०२३ Nashik Date-२७/०१/२०२३ अन्वये दि.०८/१०/२०२२ ते दि.०७/०९/२०२३ या कालावधीसाठी रक्कम रु.५०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार मात्र) प्रति महिना याप्रमाणे नियुक्ती देण्यांत आलेली होती. सदर नियुक्ती दि.०७/०९/२०२३ रोजी संपुष्टात आलेली आहे.

सद्यस्थितीत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे कंपनी कायद्यानुसार कामकाज करणेकामी नव्याने कंपनी सचिव पदावर मानधन (Honorarium) तत्वावर नियुक्त करणे आवश्यक असल्याने खालील संस्थांकडून दरपत्रके मागविण्यांत आलेली होती.

| अ.क्र. | दरपत्रक धारक | शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक चे कंपनी सचिवाचे सेवा देण्यासाठीचे मानधन |
|---|---|---|
| १ | CS Vaishali S.Bhat | Rs.14,000/- per month and for XBRL filling Rs.18,000/- |
| २ | CS Jitendra Bhamare | Rs.12,000/- per month and for XBRL filling Rs.20,000/- |
| ३ | CS Ashok Surana | Rs.9,000/- per month and for XBRL filling Rs.15,000/- |

सदर दरपत्रक धारकांमधील कंपनी सचिव श्री.अशोक सुराणा यांचे प्रतिमहा रु.९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये नऊ हजार मात्र) दर सर्वात कमी असल्याने श्री.अशोक सुराणा यांना शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक येथे कंपनी सचिव पदावर तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्त्वावर प्रतिमहा रु.९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये नऊ हजार मात्र) प्रमाणे नियुक्ती करणेकामी सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१० :- कंपनी सचिव श्री.अशोक सुराणा यांचे प्रतिमहा रु.९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये नऊ हजार मात्र) दर सर्वात कमी असल्याने श्री.अशोक सुराणा यांचे ११ महिने कालावधीसाठी मानधन तत्त्वावर नियुक्तीस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय क्र.११ - शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक व शाखा कार्यालयांसाठी भाडोत्री वाहन घेण्यास मान्यता मिळणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा मार्फत अनुसूचित जमातीचे सुशिक्षित बेरोजगारांना त्यांचे जीवनमान उंचावण्याकरीता स्वयंरोजगारासाठी कर्ज स्वरुपात अल्प व्याजदराने एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली पुरस्कृत विविध योजना राबविण्यांत येतात. सद्यस्थितीत विशेष केंद्रिय सहाय्य पुरस्कृत योजना तसेच आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांचे जिवनमान उंचावण्यासाठी, कृषि, पशुधन, मस्त्यपालन, मधुमक्षीकापालन तसेच वनौपज आधारित आदिवासींचे उपजीविका वृध्दीसाठी विविध नाविन्यपूर्ण योजना राबविण्यांत येत आहेत.

सदर योजना राबवितांना सर्व शाखा व्यवस्थापकांनी दैनंदिन कामकाज सांभाळून यापुर्वी कर्ज वाटप करण्यांत आलेल्या एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत विविध कर्ज योजनांची थकीत कर्जाची वसुली वाढविणेसाठी तसेच सद्यस्थितीत नव्याने कर्ज वाटप करण्यांत आलेल्या योजनांची देखील कर्जवसुली वाढविणेकामी लाभार्थ्यांशी पाठपुरावा करणेकामी तसेच विशेष केंद्रिय सहाय्य पुरस्कृत योजना तसेच नाविन्यपूर्ण विविध योजना राबविणेकामी स्थळ भेटी देणे, व्यवसायाची पाहणी / तपासणी करणेकामी क्षेत्रिय दौरे करणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत शबरी महामंडळात स्वमालकीचे वाहन अस्तित्वात नसुन शाखा कार्यालयांतर्गत कार्यक्षेत्रात सुरु असणारे प्रकल्प / योजना या आदिवासी दुर्गम भागात असुन सदर ठिकाणी वेळावेळी शाखा व्यवस्थापकांना भेटी देणे करीता जाणे-येणे, कर्ज वसुलीसाठी कार्यक्षेत्रात दौरे करणे, यासाठी वाहन उपलब्ध होत नसल्याने अडचणींना सामोरे जावे लागते. परिणामी सदर कार्यरत प्रकल्पांवर नियंत्रण ठेवणे शक्य होत नसल्याने शबरी महामंडळाचे मुख्य कार्यालयासाठी ०१ वाहन व अंतर्गत १२ शाखा कार्यालयांसाठी प्रत्येकी ०१ वाहन याप्रमाणे एकूण १३ वाहने असणे आवश्यक आहे. सदरकामी स्थानिक पातळीवरुन मुख्य कार्यालय व संबंधित शाखा कार्यालयांसाठी दरपत्रके मागवून भाडोत्री वाहन (बोलेरो) घेण्यास तसेच सदरचा खर्च व्यवस्थापकीय अनुदानातून / शबरी महामंडळाकडून राबविण्यांत येणाऱ्या योजनांची २% प्रशासकीय खर्च यापैकी उपलब्ध असलेल्या निधीतून करण्यांस मा.संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.
सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.११ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक व सर्व शाखा कार्यालयांसाठी प्रवास दौऱ्यासाठी भाडोत्री वाहनास मान्यता देण्यांत येत आहे. मुख्य कार्यालय नाशिक साठी प्रवास दौऱ्यासाठी मासिक २५०० किमी मर्यादेत भाडोत्री वाहन घेण्यास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच शाखा कार्यालयांसाठी कार्यक्षेत्रात दौरे करण्यासाठी मासिक २००० किमी मर्यादेत कमाल मासिक रक्कम रु.४०,०००/- यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे भाडोत्री वाहन घेण्यास मान्यता देण्यांत येत आहे. त्याअनुषंगाने स्थानिक पातळीवरुन दरपत्रके मागवून भाडोत्री वाहन घेण्यास मान्यता देण्यांत येत असुन वाहन भाडयाने घेण्यासाठी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन सदरचा खर्च व्यवस्थापकीय अनुदानातून / शबरी महामंडळाकडून राबविण्यांत येणाऱ्या योजनांची २% प्रशासकीय खर्च यापैकी उपलब्ध असलेल्या निधीतून करण्यांत यावा.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय क्र.१२ : शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक येथे बाहय स्त्रोत यंत्रणाद्वारे मनुष्यबळ घेणे बाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना शासनाचे आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई. शासन निर्णय क्रमांक आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/ का-३ मुंबई दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अन्वये महामंडळाची निर्मिती करण्यांत आलेली आहे.

Ghakare

महामंडळाची नोंदणी कंपनी कायदा १९५६ अन्वये रजिस्टर ऑफ कंपनीज यांच्याकडे नोंदणी करण्यात आली असून कंपनीचा नोंदणी क्र.२५-१३२४७/१९९९ दिनांक १५ जानेवारी, १९९९ हा आहे. तसेच शबरी महामंडळाचा CIN No. U74210MH1999SGC118747 असा आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाअंतर्गत आज रोजी ७२ पदांचा आकृतीबंध मंजुर असुन सद्यस्थितीत एकूण १४ अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत.

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचा सध्याचा आकृतीबंध -**

शासन निर्णय क्र.आविम-१०९९/प्र.क्र.७/का.३ मंत्रालय, मुंबई-३२ दि.१३ डिसेंबर, १९९९ अन्वये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक साठी पदे निर्माण करण्यांत आली असुन पहिला टप्पा म्हणून ७२ पदांचा आकृतीबंध मंजुर करण्यांत आलेला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | पदाचे नाव | मंजुर पद संख्या | मुख्य कार्यालय नाशिक | जिल्हा / शाखा कार्यालय | एकूण पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापक | १३ | १ | १२ (प्रत्येकी एक) | १३ | ४ | ९ |
| २ | उप व्यवस्थापक | १ | १ | - | १ | १ | ० |
| ३ | लेखापाल | १३ | १ | १२ (प्रत्येकी एक) | १३ | ७ | ६ |
| ४ | निरीक्षक | १२ | - | १२ (प्रत्येकी एक) | १२ | ० | १२ |
| ५ | लघुटंकलेखक | १ | १ | - | १ | ० | १ |
| ६ | वरीष्ठ सहाय्यक | २ | २ | - | २ | १ | १ |
| ७ | रोखपाल | १ | १ | - | १ | ० | १ |
| ८ | लिपीक नि संगणक सहाय्यक | १४ | २ | १२ (प्रत्येकी एक) | १४ | १ | १३ |
| ९ | वाहन चालक | १ | १ | - | १ | ० | १ |
| १० | शिपाई | १४ | २ | १२ (प्रत्येकी एक) | १४ | ० | १४ |
| | **एकूण** | **७२** | **१२** | **६० (प्रत्येकी ५ पदे)** | **७२** | **१४** | **५८** |

उपरोक्त तपशिलात नमुद केल्याप्रमाणे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळात मंजुर ७२ पदांचे आकृतीबंधानुसार सद्यस्थितीत एकूण १४ अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत.

सद्यस्थितीत शबरी महामंडळात विविध नावीन्यपूर्ण योजना राबविण्यांत येत असुन सदर योजनांसाठी तसेच दैनंदिन कार्यालयीन कामकाजासाठी अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने कार्यालयीन कामकाज करतांना अडचणी येत आहेत.

त्याअनुषंगाने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक व अंतर्गत १२ शाखा कार्यालयांमध्ये बाहय स्त्रोत यंत्रणाद्वारे मनुष्यबळ घेण्याची आवश्यकता आहे.

तसेच शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.९३/कामगार-८ उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.०६ सप्टेंबर, २०२३ अन्वये बाहय यंत्रणेकडून कामे करुन घेण्यासाठी सेवापुरवठादार संस्थेचे / एजन्सीचे नियुक्ती करण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त नमुद केल्यानुसार शबरी महामंडळात मंजुर ७२ पदांपैकी एकूण ५८ पदे रिक्त असुन सदर रिक्त पदांच्या अनुषंगाने मुख्य कार्यालय नाशिक व अंतर्गत शाखा कार्यालयांमध्ये आवश्यकतेनुसार तसेच दि.०६ सप्टेंबर, २०२३ रोजीचे शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे बाहय स्त्रोत यंत्रणाद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याचे नियोजन आहे.



Dhakave

१) शाखा व्यवस्थापक- ०४

२) लेखापाल- ०६

३) लिपीक नि संगणक सहाय्यक - १३

करीता उपरोक्त नमूद केल्यानुसार शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.९३/कामगार-८ उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.०६ सप्टेंबर, २०२३ मध्ये नमुद पुरवठादारंचे पॅनल मार्फत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक व अंतर्गत १२ शाखा कार्यालयांमध्ये बाहय स्त्रोत यंत्रणाद्वारे मनुष्यबळ नेमणूकीस तसेच कार्यालयातील आवश्यकतेनुसार किमान वेतन तत्वावर (Minimum Wages नुसार) सफाई तथा स्वच्छता सेवा पुरवठेदार (Cleaning Services) कडून सफाई कर्मचारी / शिपाई घेणेकरीता मा.संचालक मंडळाचे मान्यतेस सादर.

सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१२ :- शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.९३/कामगार-८ उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.०६ सप्टेंबर, २०२३ मध्ये नमुद पुरवठादारंचे पॅनल मार्फत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक येथे बाहय स्त्रोत यंत्रणेद्वारे खालीलप्रमाणे मनुष्यबळ घेणेकामी मा.अध्यक्ष तथा मंत्री यांची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करण्यांस व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार देण्यांत येत आहे.**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | वरिष्ठ सहाय्यक | Data Entry Operator | शेक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य कार्यालय नाशिक | ०१ | ०१ | **१) वरिष्ठ सहाय्यक** - Graduate<br><br>**२)Data Entry Operator-** Graduate with MSCIT and typing (Marathi / English) तसेच Tally चे ज्ञान असणे आवश्यक आहे. | **१) वरिष्ठ सहाय्यक** - Min ४ years of experience<br><br>**२) Data Entry Operator-** Min २ years of experience |
| २ | शाखा कार्यालय नाशिक | - | ०१ | | |
| ३ | शाखा कार्यालय जव्हार | - | ०१ | | |
| ४ | शाखा कार्यालय जुन्नर | - | ०१ | | |
| ५ | शाखा कार्यालय नंदुरबार | - | ०१ | | |
| ६ | शाखा कार्यालय यावल | - | ०१ | | |
| ७ | शाखा कार्यालय धारणी | - | ०१ | | |
| ८ | शाखा कार्यालय यवतमाळ | - | ०१ | | |
| ९ | शाखा कार्यालय किनवट | - | ०१ | | |
| १० | शाखा कार्यालय देवरी | - | ०१ | | |
| ११ | शाखा कार्यालय नागपूर | - | ०१ | | |
| १२ | शाखा कार्यालय चंद्रपूर | - | ०१ | | |
| १३ | शाखा कार्यालय गडचिरोली | - | ०१ | | |
| | एकूण | ०१ | १३ | | |

**तसेच मुख्य कार्यालय नाशिक व १२ शाखा कार्यालयांमध्ये कार्यालयातील आवश्यकतेनुसार किमान वेतन तत्वावर (Minimum Wages नुसार) सफाई तथा स्वच्छता सेवा पुरवठेदार (Cleaning Services) कडून सफाई कर्मचारी / शिपाई घेणेकामी सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदरचा खर्च व्यवस्थापकीय अनुदानातून भगविण्यांत यावा.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**अनुमोदक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय क्र.१३- केंद्र शासनाच्या जनजाती कार्य मंत्रालय (Ministry Of Tribal Affairs) यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या प्रगती बाबत.**

केंद्र शासनाच्या जनजाती कार्य मंत्रालय (Ministry of Tribal Affairs) यांचे कडून विशेष केंद्रीय सहाय्य (Special Central Assistance), आदिम जमाती विकास (PVTGs/CCD) आणि भारतीय संविधानाच्या परिच्छेद २७५(१) (Provision under Article 275(1)) अंतर्गत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची प्रगती खालीलप्रमाणे

| Sr No | Project Name | Amount Received (₹ Lakhs) | Approved proposals | Expenditure till date (₹ Lakhs) | Amount unspent (₹ Lakhs) | Beneficiary Target | Beneficiary Covered | Remark | Balance Available |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A | **Special Central Assistance (SCA)** | | | | | | | | |
| 1 | Tata Trusts (Collective for Livelihoods initiatives improving HH incomes through layered agriculture-based livelihoods intervention (6000 HHs, Nandurbar) | 1354.82 | 1354.82 | 962.36 | 392.46 | 6000 | 1394 | Rs.734.82 Lakh is made availabale from unspend amount of Padkai Vikas Scheme | 0.00 |
| 2 | Padkai vikas (Bench Terracing) | 187.95 | | 0.00 | 187.95 | | | Rs. 2333.16 is diverted for unreceived committed liability of 3 schemes. | 187.95 |
| 3 | Biodiversity | 100.00 | 100.00 | 46.59 | 53.41 | | 420 | | 0.00 |
| 4 | CCD NGO-formation of FPO(s) in Gadchiroli and Yavatmal so as to leverage the benefits arising from collectivizing and to market the produce more efficiently for better price realization | 2000.00 | 2000.00 | 999.73 | 1000.27 | 5000 | 3273 | Rs.1500.00 Lakh is made availabale from unspend amount of Padkai Vikas Scheme | 0.00 |
| 5 | Organizing FPOs of 15000 farmers for processing, distribution, branding and retailing. | 4880.00 | 1745.80 | 1371.86 | 3508.14 | 7500 | 6411 | | 3134.20 |
| 6 | Cage Fisheries | 934.00 | 769.63 | 478.90 | 455.10 | 2607 | 2607 | | 164.37 |
| | **Sub Total** | **9456.77** | **5970.25** | **3859.43** | **5597.34** | **21107** | **14105** | | **3486.52** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **B** | **CCD/PVTGs** | | | | | | | | 0.00 |
| 1 | EAGL-Goat Rearing intervention for katkari tribes | 1050.00 | 1050.00 | 895.35 | 154.65 | 1430 | 901 | Rs.98.34 Lakh is made availabale from unspend amount of Padkai Vikas Scheme | 0.00 |
| | **Sub Total** | **1050.00** | **1050.00** | **895.35** | **154.65** | **1430** | **901** | | **0.00** |
| **C** | **Provision Under Article 275(1)** | | | | | | | | 0.00 |
| 1 | BAIF -Seed Bank for indigenous seed conservation, production, marketing and sale (PO ITDP Rajur) | 100.75 | 100.75 | 100.25 | 0.50 | 1050 | 1050 | | 0.00 |
| 2 | Organizing FPOs of 15000 farmers for processing, distribution, branding and retailing. | 3227.08 | 2080.00 | 1547.53 | 1679.55 | 7500 | 7333 | | 1147.08 |
| 3 | Bharat Rural Livelihoods foundation-Improving livelihood conditions by augmenting land and water resources, sustainable Agri practices, enhancing livestock productivity, capacity building of GPs for IFR/CFR and convergence of government schemes. | 200.00 | 200.00 | 200.00 | 0.00 | 15000 | 15000 | | 0.00 |
| | **Sub Total** | **3527.83** | **2380.75** | **1847.78** | **1680.05** | **23550** | **23383** | | **1147.08** |
| | **Total** | **14034.60** | **9401.00** | **6602.56** | **7432.04** | **46087** | **38389** | | **4633.60** |

शासन पत्र क्र. केंद्रीय-२०२२/प्र.क्र.१४१/का.१९ दि. ०३.०८.२०२३ नुसार पडकई विकास योजनेंतर्गतअसलेला अखर्चित निधी हा खालीलप्रमाणे योजनांच्या अप्राप्त निधीसाठी वापरण्याची परवानगी प्राप्त झालेली आहे. त्यापमाणे कार्यवाही सुरु आहे.

१) Tata Trusts (Collective for Livelihoods initiatives improving HH incomes through layered agriculture-based livelihoods intervention (6000 HHs, Nandurbar)
२) CCD NGO- formation of FPO(s) in Gadchiroli and Yavatmal so as to leverage the benefits arising from collectivizing and to market the produce more efficiently for better price realization
३) EAGL-Goat Rearing intervention for katkari tribes

सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.
सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१३ :- पडकई विकास योजने अंतर्गत असलेला अखर्चित निधी रक्कम रु.१८७.९५ लक्ष हा विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत राबविण्यांत येत असलेल्या Organizing FPOs of 15000 farmers for processing, distribution, branding and retailing या योजने अंतर्गत प्राप्त प्रस्तांवासाठी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय क्र.१४- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राज्य शासनाच्या निधी अंतर्गत राबविण्यांत येत असलेल्या योजनांच्या प्रगती बाबत.**

राज्य शासनाकडून प्राप्त शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची प्रगती खालीलप्रमाणे

| Sr No | Project Name | Amount Received (₹ Lakhs) | Expenditure (₹ Lakhs) | Amount unspent (₹ Lakhs) | Beneficiary Target | Beneficiary Covered |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MESCO Paramilitary Training | 100.00 | 91.70 | 8.30 | | 276 |
| 2 | Naturopathy | 143.00 | 27.62 | 115.38 | | 85 |
| 3 | MSRTC-Drivers Training (Shahada) Programme | 534.00 | 361.53 | 172.47 | 100 | |
| 4 | Mahua - Manav Vikas | 336.36 | 129.20 | 207.16 | 4500 | 3000 |
| 5 | Amchur - Manav Vikas | 544.50 | 0.00 | 544.50 | 3000 | |
| 6 | Pilot Dairy Development Scheme Through JLGs | 159.31 | 0.00 | 159.31 | 12500 | |
| 7 | Skill Development Scheme | | | | | |
| **Total** | | **1817.17** | **610.05** | **1207.11** | **20100** | **3361** |

सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.
सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१४ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राज्य शासनाच्या निधी अंतर्गत राबविण्यांत येत असलेल्या योजनांच्या प्रगती बाबत सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय क्र.१५- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या एन.एस.टी.एफ.डी.सी. नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनांच्या प्रगती बाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा मार्फत अनुसूचित जमातीचे सुशिक्षित बेरोजगारांना त्यांचे जीवनमान उंचावण्याकरीता स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदराने एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली पुरस्कृत विविध कर्ज योजना राबविण्यांत येतात.

शासन निर्णय क्रमांक-शाहमी-२०१९/प्र.क्र.५७/अर्थबळ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई दि.०९ सप्टेंबर, २०१९ अन्वये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली पुरस्कृत योजनांसाठी रुपये ५० कोटी शासन हमी पुढील पाच वर्षासाठी मिळालेली आहे.

त्यानुसार एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली यांचेकडून शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास प्रथम टप्यात एकूण ६८७ लाभार्थ्यांसाठी रक्कम रु.११,७५,५६,०००/- प्राप्त झाले असुन त्यानुसार कर्ज वाटपाची कार्यवाही करण्यांत आलेली आहे. तसेच सद्यस्थितीत एकूण ३६० लाभार्थ्यांसाठी रक्कम रुपये ६,४०,७१,०००/- प्राप्त झालेले असुन त्यानुसार कर्ज वाटपाची कार्यवाही सुरु आहे. तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | योजनेचे नाव | लाभार्थी संख्या | एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली योजनेसाठी मंजुर निधी | कर्ज वाटप लाभार्थी संख्या | कर्ज वाटप रक्कम | शिल्लक लाभार्थी संख्या | शिल्लक निधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | महिला सशक्तीकरण (रु.१ लक्ष) | २१६ | १,९४,४०,०००/- | १७८ | १,६०,२०,०००/- | ३८ | ३४,२०,०००/- |
| २ | लहान उद्योगधंदे (रु.२ लक्ष) | ८७ | १,५६,६०,०००/- | ८४ | १,५१,२०,०००/- | ०३ | ५,४०,०००/- |
| ३ | हॉटेल ढाबा व्यवसाय (रु.५ लक्ष) | १३ | ५८,५०,०००/- | ११ | ४९,५०,०००/- | ०२ | ९,००,०००/- |
| ४ | स्पेअर पार्ट / गॅरेज / ऑटो वर्क शॉप (रु.५ लक्ष) | १२ | ५४,००,०००/- | ०९ | ४०,५०,०००/- | ०३ | १३,५०,०००/- |
| ५ | प्रवासी वाहन व्यवसाय | ०९ | ७३,७१,०००/- | ०५ | ४०,९५,०००/- | ०४ | ३२,७६,०००/- |
| ६ | स्वयंसहाय्यता बचतगट (रु.५ लक्ष) | २३ | १,०३,५०,०००/- | १६ | ७२,००,०००/- | ०७ | ३१,५०,०००/- |
| | **एकूण** | ३६० | ६,४०,७१,०००/- | ३०३ | ५,१४,३५,०००/- | ५७ | १,२६,३६,०००/- |

तसेच एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली यांचेकडे यापुर्वी एकूण २७३ लाभार्थ्यांकरीता रक्कम रु.१६,९९,२०,०००.०० चा प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. तपशिल खालीलप्रमाणे-

| **Sr.no** | **Schemes Name** | **No.Of Units** | **NSTFDC Share for unit (Rs.)** | **Total Project Cost (Rs)** |
|---|---|---|---|---|
| 1 | Micro Credit –Any Business (Rs.5.0 0 Lakh) | 100 | 45000000.00 | 50000000.00 |
| 2 | AVKS- Loan Scheme (Rs.10.00 Lakh) | 50 | 45000000.00 | 50000000.00 |
| 3 | Passenger Vehicles Business | 39 | 35100000.00 | 39000000.00 |
| 4 | Transport Vehicle (Goods) | 39 | 35100000.00 | 39000000.00 |
| 5 | Auto Rickshaw Scheme | 45 | 9720000.00 | 10800000.00 |
| | **Total** | **273** | **16,99,20,000.00** | **18,88,00,000.00** |

शासन हमीच्या अनुषंगाने एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली यांचेकडे उर्वरित निधी मागणी करण्याचे नियोजन आहे. तपशिल खालीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| Total Government Guarantee (up to 31/03/2024) | 50,00,00,000/- |
| Less- Outstanding amount as on 31/03/2023 | 15,84,08,921/- |
| Less- Sanction Amount Rs.16.99 for 273 Beneficiary | 16,99,20,000/- |
| Balance Proposal Amount | 171671079/- |

उपरोक्त तपशिलात नमुद केल्याप्रमाणे एकूण ६६८ लाभार्थींसाठी रक्कम रु.१७१४.५० लक्ष चा प्रस्ताव एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली यांना मुख्य कार्यालयाचे पत्र क्र.८८३/२०२३ दि.१४/०९/२०२३ अन्वये सादर करण्यांत आलेला आहे. तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr. No | Schemes Name | No.Of Units | NSTFDC Share for unit (Rs.) | Total Project Cost (Rs) |
|---|---|---|---|---|
| 1 | Mahila Sablikaran – Any Business (Rs.2 Lakh) | 202 | 36360000.00 | 40400000.00 |
| 2 | Micro Credit – (Rs.5 Lakh) | 21 | 9450000.00 | 10500000.00 |
| 3 | Agriculture & Allied Bussines (Rs.2 Lakh) | 264 | 47520000.00 | 52800000.00 |
| 4 | Hotel/Dhaba (Rs.5 Lakh) | 60 | 27000000.00 | 30000000.00 |
| 5 | Workshop/Spare Parts (Rs.5 Lakh) | 53 | 23850000.00 | 26500000.00 |
| 6 | Vehicle Scheme (Rs.10 Lakh) | 19 | 17100000.00 | 19000000.00 |
| 7 | Small Scale Business (Rs.3Lakh) | 32 | 8640000.00 | 9600000.00 |
| 8 | Business help for handicap peoples strengthening (Tricycle) | 17 | 1530000.00 | 1700000.00 |
| | **Total** | 668 | 171450000.00 | 190500000.00 |

तसेच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची मागील आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये १,९५,१६,१६१/- तसेच चालु आर्थिक वर्षात माहे ऑगस्ट, २०२३ पर्यंत ८६,०५,०७८/- इतकी वसुली झालेली आहे.

याबाबत मा.संचालक मंडळाचे मान्यतेस्तव तथा माहितीस्तव विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१५:- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या एन.एस.टी.एफ.डी.सी. नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनांच्या प्रगती बाबत सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय क्र.१६-आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन 2023-24 वर्षात जनजाती उपयोजना क्षेत्राकरीता केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत संयुक्त दायित्व गटाच्या माध्यमातून पथदर्शी दुग्धविकास प्रकल्पाच्या सामंजस्य कराराचा मसुदा मंजुर करण्याबाबत.**

केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत ५ आदिवासी लाभार्थ्यांच्या संयुक्त दायित्व गटाचे गठन करून सदर २५०० गटांच्या माध्यमातून पथदर्शी दुग्ध विकास प्रकल्प राबविण्याच्या रु.१५९,३०,५०,०००/- इतक्या निधीच्या योजनेच्या प्रस्तावास शासनाकडून मान्यता देण्यात आलेली आहे.

केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत संयुक्त दायित्व गटांना दुधाळ जनावरे पालन करणे योजना प्रकल्प अधिकारी डहाणू, जव्हार, धुळे, नंदुरबार व कळवण या प्रकल्पात पथदर्शी स्वरुपात शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचे मार्फत राबविण्यात येत आहे. योजना अंमलबजावणीच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शक सूचना व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचे मार्फत निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी प्रकल्प कार्यक्षेत्रात आवश्यक पायाभूत सोई सुविधा, दुधाळ जनावरांची उपलब्धता करणेसाठी लागणारे सहकार्य, उत्पादित दुधाचे खरेदी, संकलन, विपणन तसेच

वेळोवेळी लागणारे तांत्रिक मार्गदर्शन हे SUMUL-The Surat District Co-operative Milk Producers' Union Ltd. यांचे मार्फत घेण्याचे आदेश आहेत.

याकरिता "आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत जनजाती उपाययोजना क्षेत्राकरिता केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत संयुक्त दायित्व गटांच्या माध्यमातून पथदर्शी दुग्ध विकास प्रकल्प" या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक व सुमूल डेअरी यांचे मध्ये करारनामा करणे गरजेचे होते. त्या अनुषंगाने SUMUL-The Surat District Co-operative Milk Producers' Union Ltd. यांचे सोबत करावयाच्या सामंजस्य कराराच्या प्ररुपास (Draft MoU) मा. मंत्री महोदय, आदिवासी विकास तथा अध्यक्ष, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., यांचे कडून मान्यता घेऊन दिनांक १४.०९.२०२३ रोजी मा. मंत्री महोदयांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करणेत आलेला आहे. करिता सामंजस्य कराराचे प्रारूप आपले माहितीस्तव सविनय सादर.

सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.
सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१६ :- -आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन 2023-24 वर्षात जनजाती उपयोजना क्षेत्राकरीता केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत संयुक्त दायित्व गटाच्या माध्यमातून पथदर्शी दुग्धविकास प्रकल्पाच्या सामंजस्य कराराचा मसुद्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय क्र.१७- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक अंतर्गत राबविण्यांत येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणीसाठी तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक हे "जन जल जंगल जमीन विकासाद्वारे आदिवासींचे सक्षमीकरण" हा उद्देश घेऊन आदिवासींच्या उपजीविका वृद्धी करणेसाठी कार्य करत आहे. शबरी महामंडळामार्फत महाराष्ट्रातील आदिवासी बहुल भागात विविध योजना राबविल्या जात आहेत. यांत विशेष केंद्रीय सहाय्य, भारतीय राज्य घटनेच्या परिच्छेद २७५(१), आदिम जमाती विकास, NSTFDC यांचा समावेश आहे.

राज्य शासनाकडून प्राप्त निधीतून आदिवासी बहुल भागात "पथदर्शी दुग्धविकास प्रकल्प" व "आदिवासी युवक-युवतींसाठी रोजगाराभिमुख कौशल्य विकास योजना" राबविण्यांत येत आहे. शबरी महामंडळांतर्गत सद्यस्थित एकूण ७२ मंजूर पदांपैकी फक्त १५ पदे भरण्यांत आलेली आहेत. शासनामार्फत भरण्यांत आलेल्या पदांमध्ये सदर योजना राबविणेसाठी लागणारे अनुभवी व तज्ञ मनुष्यबळ यांचा अभाव आहे. सदर योजना प्रभावीपणे राबविणेसाठी पुढीलप्रमाणे अनुभवी तज्ञ (Thematic Experts) असणे अत्यावश्यक आहेत.

| अ.न. | योजना | अनुभवी तज्ञ |
|---|---|---|
| १ | पथदर्शी दुग्धविकास प्रकल्प | Livestock Expert |
| २ | आदिवासी युवक-युवतींसाठी रोजगाराभिमुख कौशल्य विकास योजना | Skill Development Expert |

करीता वरील २ तज्ञ व्यक्ती (Thematic Experts) शबरी महामंडळ नाशिक येथे ११ महिने कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांना अधिकार प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव सविनय सादर.

सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.
सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमतांने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१७ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक अंतर्गत राबविण्यांत येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणीसाठी तज्ञ मनुष्यबळ घेणेकामी पुढील कार्यवाही करण्यांस व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार देण्यांत येत आहे. सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय क्र.१८- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांना सन २०२२-२३ या वर्षाकरीता बोनस / सानुग्रह अनुदानास मंजुरी मिळणेबाबत.**

शासन निर्णय १३ डिसेंबर, १९९९ अन्वये महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचे कर्मचारी सेवानियम शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास लागू आहे. त्याअनुरोधाने महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या अधिकारी / कर्मचारी यांना ज्या धर्तीवर बोनस व सानुग्रह अनुदान अदा करण्यात येते त्याच धर्तीवर शबरी महामंडळाचे कर्मचाऱ्यांना सुध्दा बोनस व सानुग्रह अनुदान अदा करण्यात येते.

सन २०२२-२३ या वर्षासाठी बोनस अधिनियमातील तरतुदीनुसार पात्र कर्मचाऱ्यांना ८.३३% प्रमाणे रुपये ३५००/- बोनस अदा करण्यास मंजुरी मिळावी.

तसेच सन २०२२-२३ मध्ये संभाव्य रु.३९०.०० लक्ष नफा अपेक्षित असल्यामुळे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांना रु.६०००/- इतके सानुग्रह अनुदान अदा करण्यास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.
सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१८:- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातील पात्र अधिकारी / कर्मचारी यांना सन २०२२-२३ या वर्षाकरीता बोनस / सानुग्रह अनुदानास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे..**

**सुचक** :- मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**आयत्या वेळेचा विषय क्र.१९.१- महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक साठी विहित कार्यपद्धतीने नेमण्यांत आलेली समिती / प्रकल्प सल्लागार समिती (PMC-Project Management Consultant) ही शबरी महामंडळाच्या प्रकल्पासाठी सुद्धा उपयोगात आणणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यांनी विहित कार्यालयीन कार्यपद्धतीचा अवलंब करुन नेमण्यांत आलेली प्रकल्प सल्लागार समितीचे (PMC-Project Management Consultant) शबरी महामंडळासाठी Empanelment प्रस्तावित करण्यांत येत आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय व शाखा कार्यालय स्तरावर कार्यालय नुतनीकरण करण्यासाठी, शेतकरी उत्पादक कंपनी /आदिवासींचे सह.संस्था / ग्राम सभा / वनधन केंद्र यांच्या प्रकल्पाअंतर्गत शेड्स व इतर अनुषंगिक बाबी साठीचे बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचेकडून नेमणूक झालेली प्रकल्प सल्लागार समिती (Project Management Consultant) यांचे मंजुर दराप्रमाणे त्याच Empanelment PMC कडून काम करुन घेण्यास मान्यता मिळावी.

सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**आयत्या वेळेचा ठराव क्र.१९.१:- महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक साठी विहित कार्यपद्धतीने नेमण्यांत आलेली** Empanelment **करण्यांत आलेली प्रकल्प सल्लागार समिती (PMC-Project Management Consultant) ही शबरी महामंडळाच्या प्रकल्पासाठी सुद्धा उपयोगात आणणेबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. PMC** Empanelment **तपशिल खालीलप्रमाणे-**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| १ | देवरे धामणे आर्किटेक्टस, नाशिक |
| २ | आर्कि. राजेंद्र गब्टानी ॲण्ड असोसिएट्स, अमरावती |
| ३ | प्रविण पगार आर्किटेक्टस नाशिक |
| ४ | स्पेस डिझायनर्स, नाशिक |
| ५ | एकम व्हेंचर, नाशिक |
| ६ | डिओ.निकम आर्किटेक्टस ॲण्ड प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट, पुणे |
| ७ | बीएलजी कन्सस्ट्रक्शन सर्व्हिसेस प्रा.लि., जोधपूर |
| ८ | परमेश असोसिएट, नाशिक |

**सुचक** :- मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**आयत्या वेळेचा विषय क्र १९.२ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२२-२३ चे प्रारुप अंतिम लेख्यास मंजुरी देणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२२-२३ चे लेखे तयार केलेले असुन सदरच्या अहवाल वर्षातील ठळक बाबी खालील प्रमाणे आहेत.

(रुपये लक्ष)

| अ.क्र | तपशिल | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|
| १ | भागभांडवल | ८७११.२१ | ८८१२.१८ |
| २ | भाग आवेदन रक्कम प्रलंबित वाटप (Share Application Money Pending Allotment) | १००.९७ | ०.०० |
| ३ | उलाढाल | ६९५.२८ | २०९७.०२ |
| ४ | नक्त संपत्ती (Net Worth) | १२७७८.३९ | १४५३३.१८ |
| ५ | राखीव निधी (Reserve & Surplus) | १५२२.३५ | ३१७६.१७ |
| ६ | कर्ज देणे (NSTFDC, New Delhi Outstanding) | १२३२.४९ | १५८४.०९ |
| ७ | कर्ज येणे (Loans to Beneficiaries) | ९६१२.८२ | १०२६२.४१ |
| ८ | गुंतवणुक व बँक शिल्लक | २४७५९.१९ | १२७८०.११ |
| ९ | देणे तरतुद | ४७३.६८ | ३७५.३२ |
| १० | स्थायी मालमत्ता | २८.७६ | ३९.५६ |
| ११ | नफा | ३८९.४६ | १६५३.८२ |

अहवाल वर्षात शबरी महामंडळास रु. १६५३.८२ लक्ष इतका संभाव्य निव्वळ नफा झालेला आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२२-२३ चे अंतिम लेखे संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर. संचालक मंडळाच्या मान्यतेनंतर मा.महालेखापाल कार्यालय, नवी दिल्ली यांचेकडून नियुक्त करण्यात आलेल्या एल.के. सराफ अँण्ड कंपनी, संवैधानिक लेखापरिक्षक, नाशिक यांचेकडे सदरचे अंतिम लेखे लेखापरिक्षणासाठी पाठविण्यास सभेकडुन मंजुरी मिळणेस विनंती.

**आयत्या वेळेचा ठराव क्र.१९.२ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या सन २०२२ - २३ या आर्थिक वर्षाच्या अंतिम लेख्यास सभेकडून मंजुरी देण्यात येत आहे व सदरचे अंतिम लेखे महामंडळाचे संवैधानिक लेखापरीक्षक पटेल कलंत्री अँण्ड असोसिएट्स, सनदी लेखापाल, नाशिक (WR0477) यांचेकडे लेखापरीक्षणासाठी पाठविण्यास सभेकडून मंजुरी देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सर्व उपस्थित संचालकांचे आभार मानुन मा.अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले आहे.

Ghakare

व्यवस्थापक (प्रकल्प)

मा.महाव्यवस्थापक (प्रशासन)

मा.महाव्यवस्थापक (वित्त)

Leena Bansod

मा.व्यवस्थापकीय संचालक

मा.अध्यक्ष सो,
शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक.